Volume: 5 Issue: 3 Pages: 45-48




# आदिवासी: आदिवासी समाज आणि महिला

**[*1] कृष्णा पांडुरंग गांगोडे**

[*1] सहा.प्रा., एम.ए. सेट-अर्थशास्त्र विभाग, महात्मा गांधी विद्यामंदिर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, सुरगाणा ता. सुरगाणा जि. नाशिक, महाराष्ट्र, भारत

**Article Info.**
**E-ISSN: 2583-6528**
**Impact Factor (QJIF): 8.4**
**Peer Reviewed Journal**
**Available online:**
**www.alladvancejournal.com**

**Received:** 12/Feb/2026
**Accepted:** 08/March/2026

***Corresponding Author**
**कृष्णा पांडुरंग गांगोडे**
सहा.प्रा., एम.ए. सेट – अर्थशास्त्र विभाग, महात्मा गांधी विद्यामंदिर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, सुरगाणा ता. सुरगाणा जि. नाशिक, महाराष्ट्र, भारत

**सारांश**
आदिवासी समाजातील महिलांची स्थिती आधुनिक समाजांपेक्षा चांगली असल्याचे निदर्शनास येत आहे. निर्वाह अर्थव्यवस्था हे आदिवासी समाजाचे वैशिष्ट्ये आहे. जिथे लोक जगण्यासाठी काम करतात. ते भविष्यासाठी पैसा कमवण्यासाठी किंवा संपत्ती जमा करण्यासाठी काम करत नाहीत. निर्वाह अर्थव्यवस्था ही जगण्यासाठी आयुष्यभर चालणारा आर्थिक संघर्ष आहे. परंतु आर्थिक अर्थव्यवस्थेत लोक पैसे कमवण्यासाठी किंवा संपत्ती जमा करण्यासाठी काम करतात जी आधुनिक अर्थव्यवस्था आहे. पुरेसा पैसा मिळवल्यानंतर एखादी व्यक्ती आर्थिक अर्थव्यवस्थेत काम न करण्याचा निर्णय घेऊ शकते. पण निर्वाह अर्थव्यवस्थेत प्रत्येकाला जगण्यासाठी काम करावे लागते. निर्वाह अर्थव्यवस्थेत पुरुषांना त्यांचे शोषण न करता महिलांच्या मदतीने उपजीविका करण्यास भाग पाडले जाते. आर्थिक अर्थव्यवस्थेत महिला सहकार्याचा अभाव पुरुषांना स्त्रियांचे शोषण करण्यास प्रवृत्त करतो आणि त्यांना राजकीय आणि सामाजिक कार्यात उतरवतो अनेक आदिवासींच्या मातृसत्ताक संस्कृतीमुळे, स्त्रियांची स्थिती इतरांपेक्षा चांगली आहे. महिला सक्षमीकरण हा शारीरिक, वैद्यकीय, सामाजिक, आर्थिक, राजकीय, कायदेशीर, सांस्कृतिक इत्यादी बाबींमध्ये पुरुषांशी महिलांची तुलनात्मक स्थिती मोजण्यासाठी एक निकष आहे.

**मुख्य शब्द:** भारतातील आदिवासी; आदिवासी समाज आणि महिला

## प्रस्तावना:

आदिवासी समजामधील साक्षरतेचे प्रमाण १२% टक्क्यांहून थोडे अधिक आहे, आणि व्यावसायिक दृष्ट्या ९०% आदिवासी लोकसंख्या शेती आणि इतर कृषी-आधारित कामांमध्ये गुंतलेली आहे, परंतु त्यांची शेतजमीन खूपच कमी असल्याने, त्यांच्यापैकी बहुतेकांकडे अल्प किंवा सीमांत जमीन आहे. अनेक आदिवासी समूह जंगलात राहत असून त्यांच्याकडे कृषी कौशल्याचा अभाव आहे आणि अनेक आदिवासी समूह ओसाड भागात राहतात. जेथे औद्योगिक एकके किंवा शहरी किंवा निमशहरी संकुले आहेत. त्याठिकाणी आदिवासी समूह बहुतांशी औद्योगिक कामावर अवलंबून आहेत. सर्व आदिवासी गट, मग ते औद्योगिक काम, शेती इत्यादी कामात गुंतलेले असले तरी, सर्वच गरिबी, अज्ञान, निरक्षरता, शोषण आणि शक्तीहीनता इत्यादी सारख्याच परिस्थितीने ग्रस्त आहेत. कारण त्यांच्यात निरक्षरता, बेरोजगारी, बिगर आदिवासी समाजाशी कमी संबंध आहे. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने पंचवार्षिक योजना सुरू केल्या. सरकारने आदिवासींच्या उत्थानासाठी कार्यक्रम सुरू केले आणि आदिवासी समाजाच्या विकासासाठी विशेष अर्थसंकल्पाची तरतूद केली. महिला हा कोणत्याही समाजाचा महत्त्वाचा घटक असतो आणि त्यांची भूमिका महत्त्वाची असते. आदिवासी समाज सामान्यतः इतर लोकांपेक्षा जास्त मागासलेला आहे. त्यामुळे आदिवासी समाजातील महिलांची स्थिती बिगर आदिवासी समाजापेक्षा वाईट आहे. भारतातील आदिवासी समाजाच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास निम्मी महिला आहेत. भारतीय आदिवासी महिला GDP च्या 65% पेक्षा जास्त उत्पादन करते. आदिवासी स्त्रिया कौटुंबिक उत्पन्नाच्या 60% कमावतात, त्यापैकी 65% पेक्षा जास्त मजूरीद्वारे कमावतात तर केवळ 40% लहान व्यवसाय करून नफा कमावतात. जर आपण भारतातील सात ईशान्येकडील राज्ये कमी केली तर आदिवासी महिलांना बेरोजगारी, मुलींची हत्या, कुपोषण, वैद्यकीय सुविधांचा अभाव, स्वातंत्र्याचा अभाव आणि यौवनपूर्व विवाह इत्यादी अनेक समस्या भेडसावत आहेत, म्हणूनच केंद्र आणि राज्य सरकारांनी अशासकीय संस्था (एनजीओ) आणि संयुक्त राष्ट्रांच्या सहकार्याने आदिवासींच्या आणि विशेषतः आदिवासी महिलांच्या उन्नतीसाठी अनेक कार्यक्रम आणि धोरणे सुरू केली आहेत. भारतातील आदिवासी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या 10% आहे. आदिवासी समाजातील महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण नगण्य आहे. शालेय स्तरावरील शैक्षणिक वर्तमान काही वेळा काही आदिवासी समाजात ते दिसून येते. पण उच्च शिक्षणासाठी पाहिजे त्या प्रमाणात प्रतिसाद हा मिळत नाही.

## आदिवासी समाजाची आणि महिलांची व्यक्तीरेखा

ग्रामीण भागात बहुतांश ठिकाणी एक गाव आणि बारा वाड्या अशी गावरचना पाहायला मिळते. त्यामुळे एखाद्या छोट्या वाडी-वस्तीतील लोकांना गावाची स्वतंत्र गाव म्हणून नोंद करून घ्यावी वाटली, तर त्याची सुविधाही अलीकडे उपलब्ध होत असताना दिसत आहे. भारतीय स्मृती ग्रंथांमध्ये आदिवासींचा उल्लेख आढळतो म्हणजे अनुलोम-प्रतिरोम यांच्या सहसंबंधात निर्माण झालेली जमात म्हणजे आदिवासी होय. आदिवासी याचा अर्थ म्हणजे त्या त्या ठिकाणचे मूळ रहिवासी डोंगराळ भागांमध्ये जंगल यांच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना वनवासी किंवा आदिवासी म्हटले जाते. महाराष्ट्रात 9.5% सुमारे लोकसंख्या असून पंधरा हजार चौरस मैल भूमीवर वास्तव्य दिसून येते. महाराष्ट्रातील आदिवासी प्रामुख्याने तीन विभागांमध्ये आढळते.1.सह्याद्री विभाग 2.सातपुडा विभाग 3.गोंडवानाचा विभाग आदिवासी निसर्गालाच आपल्या देव मानणारे आदिवासी हा शब्द आधी + आदि + वासी + वनवासी या शब्दांपासून बनला असून त्याचा अर्थ मूळ आदिवासी असा होतो. आदिवासी स्त्रिया निरक्षरता, बेरोजगारी, माहितीचा अभाव, जागरूकतेचा अभाव, शक्ती श्रेणीतील सर्वात खालची पातळी, उत्पन्नाचा अभाव, कुटुंबातील पुरुष सदस्यांवर अवलंबून राहणे, हा समाज पुरूषप्रधान समाज राहिला आहे हे आपण जाणतोच, जीवनाच्या सर्वच क्षेत्रात पुरुष व्यक्तीला स्त्रीपेक्षा अधिक शक्तिशाली बनवले जाते. यामध्ये महिलांचे शारीरिक घटकही खूप जबाबदार असतात. महिलांना समाजात केवळ चूल आणि मूल वाहकांची भूमिका पार पाडावी लागते, ही परिस्थिती त्यांना घरातीलच काम किंवा इतर कोणतेही काम करण्यास भाग पाडते. आदिवासी समाजात महिलांचे शिक्षण, विवाह, त्यांचे आर्थिक हक्क, त्यांचे हस्तकला आणि शेती, धार्मिक हक्क हे चर्चेचे विषय राहिले आहेत. समाजाच्या प्रगतीत महिलांचे योगदान निश्चितच महत्त्वाचे आहे. मात्र असे असतानाही आदिवासी समाजातील महिलांवर होणारा अत्याचार चिंताजनक आहे. हे थांबवण्यासाठी जनजागृतीचे कार्यक्रम राबवले जात असले, तरी उघडपणे त्यांचा छळ थांबवण्याची गरज आहे. जे हळूहळू आदिवासींचे सक्षमीकरण करण्यात यशस्वी होईल. आदिवासी संस्कृती निसर्गाच्या कुशीत स्वतंत्रपणे विकसित झाली आहे. ज्यामध्ये आदिवासी महिलांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान देण्यात आले होते आणि लिंगभेद नव्हता परंतु सध्याच्या काळात आयाम बदलत आहेत. बाह्य हस्तक्षेप, आदिवासी भागातील खनिजांचा उदय, सांस्कृतिक संपर्क,रूढी परंपरा आणि अंध-अनुकरणाची प्रवृत्ती यांचा आदिवासी समाजातील महिलांच्या जीवनावर खोलवर परिणाम झाला आहे. आदिवासी समाजात लक्षणीय भिन्नता दिसून येते. साधारणपणे, आदिवासी स्त्री-पुरुषांचे संतुलित लिंग गुणोत्तर हे निरोगी आणि अनुकूल सार्वजनिक सामाजिक संरचना दर्शवते.

## विवाहः वैवाहिक गटबंधन

आदिवासी समाजात विवाह हा सामान्यतः सामाजिक करार मानला जातो. लग्नासाठी स्त्रीची सहमती खूप महत्त्वाची ठरत असते. अपवाद म्हणून काही आदिवासी समाजांमध्ये होणारे अपहरण आणि खरेदी केलेले विवाह समाजातील स्त्रियांची निम्न स्थिती दर्शवतात. आदिवासी महिला स्वावलंबी असून पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून चालतात. आर्थिक विकासाच्या विविध टप्प्यांवर उत्पादन व्यवस्थेच्या विविध क्षेत्रात त्यांचे योगदान आणि सहभाग प्रशंसनीय वाटतो. आदिवासी समाजाच्या अर्थव्यवस्थेत महिलांची भूमिका नेहमीच महत्त्वाची राहिली आहे. आदिवासी समाजातील आदिवासी परंपरा रितीरिवाजाला मोठ्या प्रमाणात मान देऊन आरंभ करत असतात.

## विधवा पुनर्विवाह

साधारणपणे आदिवासी समाजात पतीच्या मृत्यूनंतर पत्नीला लग्न करण्याची मुभा असते. काही आदिवासी पितृवंशीय समाजात, भावांना त्याच्या मृत्यूनंतर मृत भावाची मालमत्ता, पत्नी आणि मुले देखील वारसा हक्काने मिळतात. विधवा पत्नीशी सहवास घडवून कुटुंब वाढवावे, अशी त्याच्याकडून अपेक्षा असते. या समाजव्यवस्थेचा अर्थ असा की, जमातींसोबतचा विवाह करार मोडला जात नाही. अनेक वेळा स्त्रीला तिच्या पतीच्या भावासोबत शारीरिक संबंध ठेवायचे नसतील तर तिच्यावर जबरदस्ती केली जात नाही. ती दुसऱ्या पुरुषासोबतही राहू शकते. अशी प्रथा जमातींमधील स्त्रियांची उच्च सामाजिक स्थिती किंवा विचार दर्शवते. एखाद्या महिलेच्या मृत्यूनंतर महिलेचे वडील आपल्या जावयाचे लग्न तिच्या बहिणीशी सवत म्हणून करतात. असे अनेकवेळा आदिवासींमध्ये दिसून आले आहे. या समाजामध्ये आजही विधवा विवाह आणि घटस्फोटीत विवाह काही ठिकाणी त्या स्री च्या मतानुसार सहजासहजी होत नाही. तर ते कोणाच्यातरी दबावाखाली येऊन होताना दिसतात. सुसंस्कृत जातींप्रमाणे, जमातींमधील घटस्फोट अधिक क्लिष्ट नसून सोप्या स्वरूपात आढळतात आणि स्त्रियांना पारंपारिकपणे पुरुषांप्रमाणे समान अधिकार आहेत. थारू जमातीत-पतीच्या अत्याचाराचा किंवा नपुंसकतेचा पुरावा त्याच्या पत्नीला घटस्फोट घेण्यास पात्र ठरतो. गारो जमातीत वधू किंमत परत आल्यानंतरच घटस्फोट पूर्ण होतो.

## आदिवासी समाजातील हस्तकला आणि शेतीमधील महिला

आदिवासी समाजमधील स्त्रिया अन्न गोळा करणारी, प्रगत शिकारी, वनस्पती उत्पादक आणि भटक्या विमुक्तांच्या उत्पादक म्हणून ओळखल्या जातात. उदा. मांडिया आणि गोंड जमातीच्या स्त्रिया वन्य उत्पादनांमधून पुनर्मुद्रण काढण्याचे काम करतात. साओरा, खोड आणि देव जमातीतील स्त्रिया धातू शुद्ध करणे, कातणे, विणकाम, भांडे बनवणे इत्यादी कामे करतात. थारू स्त्रिया बांधणीची वाद्ये, दोरी, चटया इ. आसामी आदिवासी महिला कपडे तयार करून आपली आर्थिक स्थिती मजबूत करतात. हस्तकलेच्या क्षेत्रात महिलांची भूमिका महत्त्वाची आहे. कलात्मक अभिव्यक्तीबरोबरच, त्यांच्या हस्तकला निर्मितीमध्ये अतूट विश्वास दिसून येतो. आदिवासी जमातीचे लोक समाजाच्या गरजा भागवण्यासाठी वस्तू तयार करतात तसेच हाताने बनवलेल्या वस्तू बाहेरच्या समाजाला विकतात. ज्यामध्ये आदिवासी महिलांचा महत्त्वाचा वाटा आहे. शेतीच्या क्षेत्रात पुरुषांना नांगरणी करण्याचा अधिकार असला तरी इतर सर्व कामांमध्ये महिलांचा सहभाग असतो. आदिवासी समाजात शेतीच्या कामात महिलांच्या सहभागावर नियंत्रण नव्हते. मात्र तंत्रज्ञानाच्या विकासामुळे महिलांचा सहभाग कमी झाला आहे. मात्र आदिवासी समाजात तंत्रज्ञानाचा फारसा शिरकाव झालेला नाही. त्यामुळे कृषी क्षेत्रातील महिलांचा सहभाग अजूनही कायम आहे.

## धार्मिक क्षेत्रातील महिला

आदिवासी समाजात धार्मिक क्षेत्रात महिलांचा दर्जा पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. पुरोहिताचे स्थान पुरुषांद्वारे मर्यादित आणि नियंत्रित आहे. ज्या जमातींमध्ये महिलांचा दर्जा सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात आदरणीय आहे, तिथेही धार्मिक बाबतीत त्यांचे स्थान दुय्यम आहे. संथालाप्रमाणे महिलांना समाजाच्या सामुदायिक पूजेत सहभागी होता येत नाही. हा अधिकार फक्त पुरुषांपुरता मर्यादित आहे. आजारी लोकांवर उपचार करण्यात आणि तंत्र-मंत्राद्वारे शत्रूंचा नाश करण्यात पटाईत असतात. संथालांमध्येही स्त्रिया जादुई ज्ञानात पारंगत मानल्या जातात. आदिवासी समाजातील महिला या आधीपासूनच सामाजिक रोगराई ची पूर्ण माहिती नसल्यामुळे या अजही. अंधश्रद्धा जडीबुटी तसेच आजीबाईचा बटवा अशा श्रद्धेला अनुकरण करताना आढळतात.

## आदिवासी समाजाची एकाग्रता

आदिवासी प्रादेशिक विकास या विभागाची स्थापना सन 1975 मध्ये करण्यात आली. आदिवासी उपयोजना क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी म्हणजे आदिवासींच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक विकासासाठी आदिवासी विकासाच्या विविध योजना तयार करण्यात आल्या आहेत. ग्रामीण समाजाचा एक भाग जंगलात आणि डोंगराळ भागात राहतो. त्यांची भाषा, राजकीय संघटना, सामाजिक संघटना आणि धार्मिक श्रद्धा यांच्या आधारावर अनेक भिन्न समुदाय मानवी उत्क्रांतीपासून वेगळे झाले आहेत. आज या समुदायातील लोकांना आदिम जात, आदिवासी, वनजाती आणि अनुसूचित जमाती म्हणून संबोधले जाते. या प्रत्येक समुदायाचे स्वतःचे नाव आहे ज्याद्वारे ते सहजपणे ओळखले जाऊ शकतात. जो वर्षानुवर्षे दुर्गम भागात राहतो. त्यामुळेच आज या समाजांपर्यंत विकास पोहोचलेला नाही. संपूर्ण समाजाची व्याख्या आदिवासी किंवा जमाती अशी केली आहे. शतकानुशतके हा वर्ग सर्वच क्षेत्रात सर्वाधिक शोषित, अत्याचारित आणि उपेक्षित राहिला आहे आणि आजही आहे. आदिवासी समाजाने आपली सभ्यता आणि परंपरा जपताना आढळतात त्यात महिलांची एकाग्रता महत्वाची ठरते. भारतात राज्यघटना तयार झाल्यानंतर डॉ.बी. आर. आंबेडकरांचे अमूल्य योगदान पाहता येईल. आता स्त्रियांचा संकोच कमी झाला आहे आणि शतकानुशतकांच्या गुलामगिरीच्या परंपरेचे बेड्या तोडण्यासाठी घटनात्मक शस्त्रे त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. ज्याद्वारे ती समतेने स्वातंत्र्याचे जीवन जगू शकते.

## आदिवासी महिलांमधील शिक्षणाची स्थिती

भारतातील आदिवासी लोकसंख्या संख्यात्मक दृष्ट्या लहान अल्पसंख्यांक असूनही समूहांची प्रचंड विविधता दर्शवते सामान्य वरील सामान्य संस्कृती सामायिक करतात परंतु विविध पैलूंमध्ये भिन्न आहे लोकसंख्येचा आकार उपजीविकेच्या पद्धती विकासाची पातळी सामाजिक समाधानाची आहे. 1.उपजीविका आणि व्यवसाय 2. शिक्षण 3. आरोग्य 4.अनैच्छिक विस्थापन आणि स्थलांतर जमीन आणि इतर समाज संसाधनांपासून परावृत्त करणे यासारख्या विविध प्रकारच्या वंचितांना सामोरे जावे लागले होते. आदिवासी महिलांना आरोग्याच्या समस्या पाण्याची उपलब्धता प्राथमिक शिक्षण इत्यादी तसेच अनेक मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. "जर तुम्ही एखाद्या पुरुषाला शिक्षित केले तर तुम्ही एखाद्या व्यक्तीला शिक्षित करता तथापि जर तुम्ही स्त्रीला शिक्षित केले तर तुम्ही संपूर्ण कुटुंबाला शिक्षित करतात महिला शक्ती म्हणजे भारत माता सशक्त .मा. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू" महिलांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्वातंत्र्यापूर्वी प्रथम शिक्षणाची ज्योत जागवली. जर मुलगी/स्त्री शिक्षित असेल तर ती दोन कुटुंबातील सदस्यांना शिक्षण देऊ शकते. याच विचाराच्या आधारे देशात महिला शिक्षण कायदा स्थापन करण्यात आला ज्यामध्ये विविध आयोग, समित्या आणि संघटनांच्या माध्यमातून सरकारला अहवाल सादर केला. एखाद्या देशाच्या आर्थिक प्रगतीचे आणि विकासाचे प्रत्यक्षात मूल्यमापन केले, तर त्या देशातील महिलांच्या शिक्षणाच्या पातळीचे आकलन करून त्या देशाची खरी स्थिती कळू शकते, असे मानले जाते.

**१. ताराबाई मोडक:-** आदिवासींच्या मुलांसाठी अंगणवाड्या सुरू केल्या गप्पा गोष्टी प्रत्यक्ष कार्यातून शिक्षण करून शाळा प्रयोग तांत्रिक व्यावसायिक शिक्षणाचा प्रसार करण्यात स्वतःला वाहून घेतले.

**२.अनुताई वाघ:–** ताराबाईच्या सहवासातून प्रेरणा घेतली कोसबाडच्या टेकडीवर आदिवासींच्या मदतीसाठी एक संस्था स्थापन केली. या संस्थेलाच कोसबाड प्रकल्प म्हणून ओळखले जाऊ लागले. आदिवासींच्या शिक्षणासाठी अनुताई वाघ यांनी पाळणाघरे बालवाड्या प्राथमिक शाळा प्रौढ शिक्षण वर्ग बालसेविका ट्रेनिंग कॉलेज इत्यादी शैक्षणिक संस्था सुरू केल्या,त्यांना या परिश्रमाबद्दल भारत सरकारने पदश्री पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आले. जमनालाल बजाज पुरस्कार आदर्श शिक्षिका तसेच महाराष्ट्र शासनाद्वारे दलित मित्र इ. पुरस्कार आणि सन्मानित करण्यात आले 'कोसबाडच्या टेकडीवरून' हा त्यांनी लिहिलेला ग्रंथ कोसबाडच्या लोक जीवनाचे वास्तव दर्शन घडवतो. महिलांच्या नेतृत्व आणि क्षमतांच्या प्रश्नाबाबत वैचारिक मतभेद दूर करते. अनुसूचित जमातीच्या महिलांमध्ये राजकीय समज आणि प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी आणि महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी हा आधार आहे.

## 'पेसा' कायदा ठरतोय आदिवासी समजसाठी वरदान

समाजाच्या मुख्य प्रवाहापासून आजही दूर असलेल्या आदिवासी भागातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्या भागाच्या सामाजिक, नैसर्गिक आणि भौगोलिक संपन्नतेसाठी करण्यात आलेला पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम (पेसा) १९९६ कायदा म्हणजे आदिवासी लोकांच्या आयुष्यात सकारात्मक परिणाम करणारा आहे. या लोकांना स्वयंसिद्ध करण्याचा प्रयत्न या कायद्याच्या निर्मितीमागे असून शहरी भागाच्या तुलनेने येथील लोकांना अमर्यादित अधिकारी देण्यात आले आहेत. मात्र, २० वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेल्या या कायद्याची अद्याप पूर्णपणे माहिती आदिवासी भागातील नागरिकांना नाही. या कायद्याने त्यांना मिळालेल्या अधिकारांती जाणीव त्यांना नाही. त्यामुळे या कायद्याचा प्रचार व प्रसार करणे तितकेच आवश्यक बनले आहे. या कायद्याची अंमलबजावणी झाल्यास निश्चितच हा कायदा वरदान आहे.

## गरिबी/बेरोजगारी

आदिवासी समाजातील आदिवासी महिलांच्या अगदी पाचवीलाच पुंजलेली गरिबी असते असे म्हटले जाते, कारण पूर्ण स्वरूपाचे व्यवसायांची कमतरता या महिलांचा उदरनिर्वाह पूर्णतः पावसाच्या लपंडावावरती अवलंबून असते. म्हणजे खरीप स्वरूपाची शेती असते ती पण डोंगराळ भागात उतार माथ्यावरती असणारी शेती नसल्याने मजुरी रोजगाराच्या स्वरूप असताना दिसून येत आहे. त्यामुळे रोजगार शोधण्यासाठी ग्रामीण भागातील आदिवासी समाज आणि महिला या ज्या भागांमध्ये रोजगार पूर्णतः उपलब्ध आहे अशा ठिकाणी वकल पद्धतीने किंवा ग्रुप बनवून काही दिवस त्या ठिकाणी वास्तव्य करून रोजगार पद्धतीने काम करतात.

## निरक्षरता

पुरुष प्रधान संस्कृती आणि एकत्र कुटुंबपद्धती आसल्याने स्री वर्गाला घरातील चूल आणि मूलच ही रूढ अवलंबली जाते. आदिवासी समाजातील महिला अलीकडे शिक्षण घेताना दिसतात पण त्याअगोदर पारंपारिक पद्धतीने बळी होताना दिसत. म्हणजे स्री सूर प्रथा असल्यामुळे साक्षरतेचा दर काहीसा कमी प्रमाणात होता. पण अलीकडे हा शिक्षणाचा दर मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे.

## आर्थिक सामाजिक निर्भरता

ग्रामीण भागातील बहुतांश महिला या स्वावलंबी असतात जेणेकरून मोकळा किंवा फावल्या वेळात रोजंदारीने जाण्यासाठी स्वतःला प्रवृत्त करतात जेणेकरून घरखर्च व इतर कामासाठी आर्थिक हातभार लावण्याचा प्रयत्न होईल तसेच आदिवासी महिला या मोठ्या प्रमाणात आत्मनिर्भर स्वरूपाच्या असतात त्या गावातील किंवा आड्या पाण्यातील सामाजिक कार्यक्रम जसे लग्न सोहळा सप्ताह कीर्तन डोंगऱ्या देव इत्यादीमध्ये सहभागी होत असतात.

## व्यसनाधीनता

आदिवासी समाजामध्ये आजही बहुतांश भागामध्ये नशा/व्यसनाच्या आहारी जात आहे. सण समारंभ, विवाह देवकार्य इ. हौशी कार्यक्रमादरम्यान महिला वर्गामध्ये बहुतांश प्रमाणात व्यसन नशा या महिन्यांमध्ये होताना दिसतात तसेच सामाजिक कार्यक्रमांमध्ये व्यसनाच्या आहारी जाताना दिसत आहे. त्यामुळे बेरोजगारी वाढते तसेच यातून गरिबी ला आळा न होता गरीबी अधिक प्रमाणात वाढताना दिसते.

## निवासी समस्या

आदिवासी समाज डोंगर दऱ्या खोऱ्यामधील निवासी आहे, तसेच रोजगार आणि बेरोजगारी मोठ्या प्रमाणात असल्याने राहण्याची सोय कच्च्या व तात्पुरत्या कुडाची, छपराची, झोपडी/कुटी इ. आशा स्वरूपाची पद्धत वापरली जाते. त्यामध्ये महिला वर्ग पूर्णपणे तरबेज असतात. उदा. डोंगराळ भागात निवास असल्याने जास्त पावसाचे प्रमाण असताना रोजगारसाठी बाहेरगावी जावे लागते तेव्हा तात्पुरत्या स्वरूपाचे एक दिवसामध्ये या महिला राहण्याची व्यवस्था करताना दिसतात.

महिला या प्रामुख्याने कोणत्याही समाजाच्या महत्त्वपूर्ण भाग असतात आणि तेवढ्या प्रमाणात त्यांचे महत्त्वपूर्ण भूमिका ही असते. आदिवासी समाज आणि इतर समाजाच्या लोकांच्या तुलनेत अधिक मागासलेला आहे. अंत आदिवासी समाजामधील महिलांची स्थिती इतर समाजातील महिलांच्या तुलनेत आधी खालवलेल्या स्वरूपाची दिसून येत आहे.

## संदर्भ सूची:


1. अनुसूचित जिल्हा कायदा १८७४.
2. Ramakrishna paul, Anita samal,in journal of advance and scholarly research in allied education multidisciplinary academic research.
3. http://mr.wikipedia.org/w/index.phd?=आदिवासी (भारतीय)&oldid=२३५०६७०
4. इतिहास व भूगोल- राहुल पाटील, कपिल हांडे-Unique Academy page-१२१.१२२
5. https://marathi.indiatimes.com/maharashtra/pune-news/law/articleshow/
6. ६.Vivek Bhor | Maharashtra Times | Updated: 26 May 2015, 3:59 amFollow
7. कुलदीप जाधव, पुणे महाराष्ट्र टाइम्स.कॉम